नवराष्ट्र

पुणे, गुरुवार, दि. १६ जुलै २०२६

भरतनाट्यम \ नृत्यांगना बाला देवी चंद्रशेखर यांच्या सादरीकरणाला रसिकांची दाद

# नृत्याविष्कारातून जिवंत झाली विठ्ठलवारी

**पुणे, शहर प्रतिनिधी.** चेहऱ्यावरील सूक्ष्म व बोलके हावभाव, हातांच्या विविध मुद्रा, लय-तालातील पायांच्या गुंतागुंतीच्या हालचाली आणि शास्त्रीय संगीताच्या अवीट साथीने सादर झालेल्या भरतनाट्यम नृत्यातून पुणेकर रसिक प्रेक्षक पांडुरंगाच्या भक्तीत अक्षरशः न्हाऊन निघाले. फ्युएल शिक्षण संस्थेच्या वतीने एमईएस सभागृहात 'माऊली - एक कालातीत परंपरा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भक्ती, परंपरा, कला आणि ईश्वर यांच्यातील अतुट संबंध अधोरेखित करणाऱ्या या उत्सवाने पंढरपूर वारीचा आत्मा रसिकांसमोर जिवंत केला. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भरतनाट्यम नृत्यांगना, नृत्यदिग्दर्शिका आणि संशोधक कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांच्या बहारदार सादरीकरणाने या कार्यक्रमात रंग भरले.



या दिमाखदार सोहळ्याला फ्युएल शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. केतन देशपांडे, फ्युएल शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) मयूरी देशपांडे, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) सचिन अंबरडीकर, अमित वाजगे, चंद्रशेखर बलरामन यांच्यासह समाजातील विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित नागरिक व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन स्मिता कुलकर्णी यांनी केले.

## नृत्यातून अवतरली संतांची वाणी

संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज आणि संत एकनाथ महाराज यांच्या विविध अभंग, ओव्या आणि भारुडांवर आधारित अप्रतिम नृत्याविष्कार सादर करण्यात आला. यामध्ये 'उदंड पाहिले उदंड ऐकिले', 'सुंदर ते ध्यान', 'रूप पाहता लोचनी', 'खेळ मांडियला वाळवंटी घाई', 'कशी जाऊ मी वृंदावन' आणि 'मुरली वाजवितो कान्हा' यांसारख्या लोकप्रिय भक्तीरचनांचा समावेश होता. अध्यात्माने समृद्ध असलेल्या या नृत्यप्रकाराच्या माध्यमातून पंढरीच्या वारीचा इतिहास, महाराष्ट्राची संस्कृती आणि मानवी भावभावनांचा प्रवास प्रभावीपणे प्रेक्षकांसमोर मांडण्यात आला, ज्याला रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

"प्रत्येक कलाकाराला समाजाकडूनच खरी प्रेरणा आणि पाठबळ मिळत असते. त्यामुळे समाजाचे ऋण फेडण्याची नैतिक जबाबदारी प्रत्येक कलाकाराची आहे. वंचित महिलांच्या सक्षमीकरणासाठी फ्युएल शिक्षण संस्था अत्यंत कौतुकास्पद कार्य करत आहे. या सामाजिक कार्याला पाठिंबा देण्यासाठी मी खास अमेरिकेतून भारतात आले असून, या कार्यक्रमासाठी मी कोणतेही मानधन स्वीकारलेले नाही."

— **कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर,** आंतरराष्ट्रीय नृत्यांगना

"महिलांना रोजगारक्षम कौशल्यांचे मोफत प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी आमची संस्था कटिबद्ध आहे. दर्जेदार सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्याचा आमचा मानस आहे. प्रेक्षकांवर तिकिटाचा भार न टाकता हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असावा, यासाठी कॉर्पोरेट संस्थांकडून प्रायोजकत्व मिळवून आम्ही हे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहोत."

— **डॉ. केतन देशपांडे,** संस्थापक अध्यक्ष, फ्युएल शिक्षण संस्था